नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे | अंक - १६६ | वार बुधवार दि. ५ नोव्हेंबर २०२५
Year - 3rd | Issue - 166 | Blow- Wednesday Date 5 November 2025
ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com
वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com
पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs
पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026
ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

संपादकीय....

शेतकऱ्यांची थट्टा

मराठवाडा आणि आजूबाजूच्या परिसरात एवढ्या मोठ्या प्रमाणात अतिवृष्टी झाली आणि त्यामुळे शेतकरी घायकुतीला आला. अशा वेळी नुकसानीची लवकरात लवकर आणि स्पष्ट उजेडात पाहणी होऊन मदत मिळेल अशी आशा पूरग्रस्त शेतकऱ्यांना होती. पण प्रशासनाने अखेर त्यांचा खरा 'रंग' दाखवल्याची चर्चा आहे. नुकसानीची पाहणी करायला एका महिन्याने केंद्रीय पथक सोलापुरात आलं खरं, पण त्यांना रात्रीचा मुहूर्त सापडला. एवढ्या व्यस्ततेतून वेळ काढत या पथकाने रात्रीच्या अंधारात, टॉर्चच्या मदतीने पुरामुळे झालेल्या नुकसान पाहणीचा 'दिखावा' केला. सोलापुरातील मोहोळ तालुक्यात केंद्रीय पथकाच्या सदस्यांनी पाहणी केली. मोहोळ तालुक्यातील कोळेगाव या ठिकाणी केंद्रीय पथक रात्रीच्या अंधारात दाखल झालं. सीना नदीमुळे झालेल्या नुकसानीची पाहणी करण्याची जबाबदारी या पथकावर होती. महत्त्वाचं म्हणजे कोळेगावातील नुकसानीच्या पाहणी दौरा आधीपासूनच नियोजित होता अशी माहिती सूत्रांनी दिली. पण मंगळवारी हे पथक पुण्याहून इतक्या उशीराने निघाले की रात्री उशीरा कोळेगावात पोहोचले. मग त्यांनी अंधारातच घाईघाईने पाहणी उरकली. ही तिथल्या शेतकऱ्याची क्रूर चेष्टाच आहे. यामुळे परिसरात संतापाचं वातावरण आहे. चार सदस्यीय केंद्राचे पथक मोहोळमध्ये रात्रीच्या अंधारात दाखल झालं. यावेळी केंद्रीय पथकातील अधिकाऱ्यांनी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांशीही संवाद साधला. केंद्राच्या या पथकाने सोलापूरचे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्याकडून जिल्ह्यात झालेल्या अतिवृष्टी, पुराची माहिती घेतली. तसेच त्यामुळे झालेल्या नुकसान बाबतही जाणून घेतले. रात्रीच्या वेळी, काळकुट्ट अंधारात या पथकाने पूरस्थितीची पाहणी केली. या पथकासोबत आलेल्या कर्मचाऱ्यांनी आपल्या टाचा वर केल्या, हात जितके जातील तितके वर करून लांबच लांब टॉर्च पाडला. त्या टॉर्चच्या उजेडात या केंद्रीय पथकाने नुकसान स्थितीचा आढावा घेतला. या पथकाने कोळेगावातील काही शेतकऱ्यांशी रात्रीच्या अंधारातच चर्चा केली. अतिवृष्टीमुळे आलेल्या पुरामुळे आपल्या कुटुंबाच्या, पोराबाळांच्या आयुष्यात अंधार कसा पडलाय हे शेतकऱ्यांनी घायकुतीला येऊन सांगितलं. ते केंद्रीय पथकाच्या अधिकाऱ्यांनी ऐकूनही घेतलं. तसेच जिल्हा प्रशासनातील अधिकाऱ्यांशी या पथकाने त्याच ठिकाणी चर्चा केली.

आदरणीय दादांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!

माझे प्रेरणास्रोत आणि राजकीय आदर्श, आदरणीय दादांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!

दादा, आज तुमच्या वाढदिवसानिमित्त तुमच्याबद्दल दोन शब्द व्यक्त करताना मन भरून येतं. तुम्ही केवळ माझे दैवत नाही, तर माझ्या आयुष्याचं सोनं करणारे सोन्यासारखे माणूस आहात.

संघर्षशील नेतृत्वाला आणि निष्ठावंत कार्यकर्त्यांच्या पाठीराख्या दादांना वाढदिवसाच्या खूप खूप शुभेच्छा! ॅ

तुम्ही माझ्या पालकत्वाची जबाबदारी केवळ घेतली नाही, तर ती एका मर्यादेत न ठेवता, मला अनेक संकटातून वाचवून योग्य मार्ग दाखवला. माझ्यासाठी तुम्ही केवळ 'दादा' नसून, माझे मार्गदर्शक, संरक्षक आणि आधारस्तंभ आहात.

खंबीर राजकीय नेतृत्व आणि कार्यकर्त्यांसाठीचा आधार

तुम्ही आम्हाला केवळ घडवलं नाही, तर राजकीय आणि सामाजिक जीवनात निष्ठा आणि कर्तृत्वाची खरी जाणीव करून दिली. निष्ठावंत कार्यकर्त्यांच्या मागे खंबीरपणे थांबणारे आणि त्याची ताकद काय असते, हे तुम्ही सिद्ध केले आहे. एका मागासवर्गीय पोराला त्याच्या धडपडीत खंबीर राजकीय साथ देऊन त्याला घडवणं, हे फक्त दादाच करू शकतात, आणि तुम्ही ते करून दाखवलं आहे. तुमच्यामुळेच आज माझ्यासारख्या कार्यकर्त्याला तालुक्यात एक सन्मानाची ओळख मिळाली आहे.

ज्यावेळी काही समाजकंटक योग्य मार्गाने जाणाऱ्यांच्या मार्गात अडथळे निर्माण करतात, त्यांच्या तोंडावर सणसणीत चपराक मारून, माझ्यासोबत काम करणारा प्रत्येक कार्यकर्ता हा माझा पाठीचा कणा आहे हे तुम्ही ठामपणे सांगता. राजकारणातील हे तुमचं कणखर आणि कार्यकर्त्यांना ऊर्जा देणारं नेतृत्व आमच्यासाठी अमूल्य आहे. कोणत्याही संकटावेळी फोन केला, तर तो उचलून केवळ ऐकून कानाडोळा न करता, तुम्ही त्या क्षणी अधिकाऱ्यांना फोन करून जाब विचारता. माझ्या कार्यकर्त्यावर जर अन्याय झाला तर गाठ माझ्याशी आहे, असं ठणकावून सांगणारे तुम्हीच आहात! कार्यकर्त्यावरच्या अन्यायाविरुद्ध लढण्याची तुमची ही जिद्द आम्हाला नेहमीच लढण्याची प्रेरणा देते. आकाश, तो विषय सोडून दे, जोपर्यंत मी आहे, तोपर्यंत तुमच्यासोबत चुकीचं घडू देणार नाही, हे तुमचे शब्द माझ्यासारख्या कार्यकर्त्यासाठी राजकीय कवच आणि आश्वासक आधार आहेत.

संघर्ष तुमचा, निष्ठा आमची, राजकारण तुम्ही चालवता,

कणखर नेतृत्वाने कार्यकर्त्यांना, नवी उमेद देता.

जनसेवेत तुम्ही अखंड, आधार

आम्हा सर्व कार्यकर्त्यांचा,

जन्मदिन तुमचा, दादा, उत्सव हा लाखो शुभेच्छांचा!

प्रेरणादायी आणि लोककेंद्री विचार

दादा, तुम्ही नेहमी सांगता, लोकांसाठी लोकहिताचे काम करा व गोरगरीब जनतेच्या कामी या, संघर्ष करत राहा आणि यश तुमच्या पायाशी असेल. तुमच्या या प्रेरणादायी आणि लोककेंद्री विचारांनी आम्हाला नेहमीच योग्य दिशा दिली आहे आणि जनसेवेचं खरं महत्त्व शिकवलं आहे.

तुम्ही नेहमी मला योग्य मार्गदर्शन करता: तुला खूप मोठे व्हायचं आहे, तू अजून खूप छोटा आहेस, तू धडपड आहेस, तुझ्या पाठीशी मी खंबीरपणे उभा राहील, फक्त काही चुकीचं करू नको. तुमच्या या शब्दांमुळेच मी आज तुमच्या नेतृत्वाखाली सक्षम कार्यकर्ता म्हणून उभा आहे.

विचारांची दिशा आणि कार्याचा वसा, तुम्हीच आम्हांला दिला,

राजकारणात तुमचा शब्द म्हणजे, न्यायाचा बुलंद किल्ला.

गोरगरिबांसाठी झटणारे, जनसेवेचे तुमचे व्रत,

अशा खंबीर नेत्याला वाढदिवसाच्या शुभेच्छा, अनंत!

माझ्या राजकीय आणि सामाजिक जीवनातील आदर्श, दादांना पुन्हा एकदा वाढदिवसाच्या कोटी कोटी शुभेच्छा!

तुमचे आयुष्य नेहमी सुखसमृद्धीने, यशाने आणि अखंड आनंदाने भरलेले राहो. तुम्ही नेहमी उत्तम आरोग्याने आणि नव्या उमेदीने जनतेच्या सेवेसाठी कार्यरत रहा, हीच ईश्वर चरणी प्रार्थना!

तुम्ही आमच्यासाठी एक उत्कृष्ट आदर्श आणि निष्ठावान नेतृत्वाचे प्रतीक आहात. तुमच्या मार्गदर्शनाने आणि प्रेमाने आम्ही सर्वजण तुमच्या सोबत आहोत.

तुम्हाला एकच वचन: तुमच्या मार्गदर्शनाखाली आम्ही जनहिताच्या कामात आणि तुमच्या राजकीय संकल्पना पूर्ण करण्यासाठी नेहमीच कटिबद्ध राहू!

– आकाश माने
ग्रामपंचायत सदस्य व युवा उद्योजक अक्कलकोट

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जाहीर होण्याआधी निर्णयांचा धडाका; फडणवीस सरकारचे २१ मोठे निर्णय

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

मुंबई: स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या तारखा आज जाहीर होण्याची शक्यता आहे. आज संध्याकाळी चार वाजता निवडणूक आयोगाची पत्रकार परिषद आहे. त्याआधी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्त्वातील महायुती सरकारनं निर्णयांचा धडाका लावला आहे. विविध विभागांकडून २१ निर्णय जाहीर करण्यात आले आहेत. या निर्णयांची माहिती मुख्यमंत्री सचिवालयाकडून देण्यात आली आहे.

(सार्वजनिक बांधकाम विभाग)

विरार ते अलिबाग बहुउद्देशिय वाहतूक मार्गिका (तचचउ) प्रकल्पाच्या कर्जास शासन हमी देण्यास मान्यता. हुडको कडून घेण्यात येणारे हे कर्ज महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ भूसंपादनासाठी येणाऱ्या खर्चासाठी वापरणार आहे.

(उच्च व तंत्रशिक्षण विभाग)

नागपूर येथील लक्ष्मी नारायण अभिनव तंत्रज्ञान (एलआयटी) विद्यापीठ, नागपूर विद्यापीठास निधी देण्यास मान्यता. सन २०२५-२०२६ ते सन २०२९-२०३० या कालावधीकरीता दरवर्षी ७ कोटी रुपयांचा निधी चार हप्त्यात वितरीत करण्यात येणार. संस्था १९४२ मध्ये स्थापन झालेली ही संस्था रसायन तंत्रज्ञान क्षेत्रात नावाजलेली संस्था.

(महसूल विभाग)

सोलापूर जिल्ह्यातील मौजे कुंभारी (ता. दक्षिण सोलापूर) येथील असंघटित कामगारांच्या प्रधान मंत्री आवास योजने अंतर्गत उभारण्यात येणाऱ्या ३० हजार घरांच्या गृहप्रकल्पास अनर्जित रक्कम, नजराणा रक्कम व अकृषिक करातून सवलत देण्यास मान्यता.

(महसूल विभाग)

वाशिम जिल्ह्यातील मौजे वाईगोळ (ता.मानोरा) येथील मधील १.५२ हे.आर. जागा ग्रामपंचायत, वाईगौळ यांना भक्त निवास व यात्रेकरूंसाठीच्या सोयी-सुविधा उभारण्याकरिता विनामूल्य देण्यास मान्यता.

(विधि व न्याय विभाग)

पुणे जिल्ह्यात घोडनदी (शिरुर) येथे जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय व दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर तसेच शासकीय अभियोक्ता कार्यालय यांची स्थापना होणार. त्यासाठी आवश्यक पद निर्मितीस मान्यता.

(विधि व न्याय विभाग)

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील पैठण येथे दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालय होणार. त्यासाठी आवश्यक न्यायीक अधिकारी व कर्मचाऱ्यांची पद निर्मितीस मान्यता.

(वित्त विभाग)

राज्य मालमत्ता पुनर्रचना कंपनी चक ठउ ड्खचखढएऊ बंद करण्यास मंजुरी. केंद्राच्या नॅशनल अँसेट रिकन्स्ट्रक्शन कंपनीची स्थापन केली होती, त्याच धर्तीवर राज्य कंपनीची स्थापना सप्टेंबर २०२२ मध्ये स्थापन करण्यात आली होती. भारतीय रिझर्व्ह बँकेने २०२३ मध्ये या कंपनीला परवाना नाकारल्याने, कायदेशीर दृष्ट्या या कंपनीला कामकाज पाहणे शक्य नसल्याने, कंपनी बंद करण्याचा निर्णय.

(ग्राम विकास विभाग)

ग्रामपंचायत कर्मचा-यांचे वेतन देण्यासाठी असलेल्या कर वसुलीच्या अटीत सुधारणा. कर्मचाऱ्यांना दिलासा.

(मत्स्यव्यवसाय विभाग)

मत्स्यव्यवसायास कृषी समकक्ष दर्जा देण्यात आल्याने मच्छिमार, मत्स्यसंवर्धक व मत्स्यकास्तकारांना बँकाकडून देण्यात येणाऱ्या अल्प मुदतीच्या खेळत्या भांडवलाच्या कर्जावर ४ टक्के व्याज परतावा देण्यास मान्यता.

(अल्पसंख्याक विकास विभाग)

हिंद-की-चादर श्री. गुरुतेग बहादूर साहिब जी यांच्या ३५० वी शहीदी समागम शताब्दी कार्यक्रमास आवश्यक निधीस मान्यता. नांदेड, नागपूर आणि रायगड जिल्ह्यांतर्गत राज्यभरातील विविध ठिकाणी होणाऱ्या कार्यक्रमांच्या आयोजनासाठी ९४ कोटी ३५ लाख ६४ हजार रुपयांच्या निधीच्या तरतुदीस मान्यता.

(सामान्य प्रशासन विभाग)

प्रस्तावित महाराष्ट्र जनविश्वास अध्यादेश, २०२५ मधील तरतुदीमधील सुधारणांना मान्यता.

(महसूल विभाग)

जमीन मुंबई उपनगर जिल्हातील मौजे वांद्रे (ता. अंधेरी) येथील ३० वर्ष कालावधीसाठी एक रुपया नाममाफ वार्षिक भाडेपट्ट्याने प्रदान केलेल्या ६४८ चौ.मी. शासकीय जमिनीसमोरील ३९५ चौ.मी. भुखंडावर आवश्यक अन्य सोयी-सुविधा पुरविण्यास मान्यता.

(महसूल विभाग)

अकृषिक कर आकारणी तसेच जमिनीच्या अकृषिक वापराच्या परवानगी व सनदेबाबतच्या तरतुदींमधील सुधारणांना मान्यता. त्यासाठी महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मध्ये सुधारणा करण्यात येणार

(सार्वजनिक आरोग्य विभाग)

महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना व आयुष्मान भारत- प्रधानमंत्री जन आरोग्य योजना या विस्तारीत योजनेअंतर्गत आयुष्मान कार्ड निर्माण व वितरण करणाऱ्या क्षेत्रिय स्तरावरील कर्मचाऱ्यांच्या मानधनात वाढ करण्यास मंजुरी.

(सार्वजनिक आरोग्य विभाग)

राज्यातील नागरिकांना आरोग्य सुविधा आणि चांगले उपचार व्हावेत यासाठी महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना व आयुष्मान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेअंतर्गत उपचारांच्या यादीत सुधारणा करण्यास मान्यता.

(सार्वजनिक आरोग्य विभाग)

राज्यातील सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत शहरी आरोग्य आयुक्तालय स्थापन करणार. आरोग्य सुविधांचे विकेंद्रीकरणामुळे नागरिकांना दिलासा.

(नियोजन विभाग)

परशुराम आर्थिक विकास महामंडळ, वीर शिरोमणी महाराणा प्रताप आर्थिक विकास महामंडळ व श्री वासवी कन्यका आर्थिक विकास महामंडळाच्या योजनांना मंजुरी.

(वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग)

बारामती येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय वैद्यकीय महाविद्यालयासाठी सहयोगी प्राध्यापकांची पाच पदे निर्माण करण्यास मान्यता. त्यासाठी आवश्यक खर्चाच्या तरतुदीस मंजुरी.

(नगरविकास विभाग)

वर्धा शहरातील रामनगर येथील भाडेपट्ट्याने दिलेल्या भूखंडधारकाला निवासी भूखंड कायमस्वरुपी मालकी हक्काने देण्यास मंजुरी

(सार्वजनिक आरोग्य विभाग)

राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कार्यरत कंत्राटी कर्मचाऱ्यांचे नियमित पदावर समायोजन करण्याच्या निर्णयात दुरुस्तीस मान्यता. अभियानात १४ मार्च २०२४ रोजी दहा वर्ष सेवा पूर्ण झालेल्या कंत्राटी कर्चाऱ्यांचे समकक्ष पदाव समायोजन. सेवा प्रवेश नियमांत दुरूस्ती न एक वेळची बाब म्हणून समायोजन केले जाणार. सार्वनजिक आरोगय विभागातील पदांबरोबर, ग्राम विकास विभागामार्फत भरण्यात येणारी आरोग्य सेवेतील रिक्त पदांबाबतचा निर्णय.

(उच्च व तंत्रशिक्षण विभाग)

चंद्रपूर जिल्हयातील मुल येथे ३०० प्रवेश क्षमतेचे नवीन पदविका अभियांत्रिकी शासकीय तंत्रनिकेतन सुरु करण्यात येणार. त्यासाठी आवश्यक ३९ शिक्षक व ४२ शिक्षकेतर पदांना व त्यासाठीच्या खर्चाच्या तरतुदीस मान्यता.

बृहन्मुंबई महानगरपालिकेत एक्झिक्युटीव्ह असिस्टंटपदी निवड! राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार उद्योग व व्यापार विभागाकडून कुणाल पवार यांचा सत्कार

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पंढरपूर : बृहन्मुंबई महानगरपालिका (इचउ) येथे एुशलींळींश ीळींरपीं या महत्त्वाच्या पदावर नुकतीच निवड झालेल्या राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या माजी तालुकाध्यक्ष अनिताताई पवार यांचे चिरंजीव श्री. कुणाल राजेंद्र पवार यांचा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष, व्यापार व उद्योग आघाडीचे प्रदेशाध्यक्ष श्री. नागेश दादा फाटे यांच्या वतीने आज आदरपूर्वक सत्कार करण्यात आला.

सत्कार समारंभानंतर बोलताना, प्रदेशाध्यक्ष श्री. नागेश दादा फाटे यांनी श्री. कुणाल पवार यांचे अभिनंदन केले आणि त्यांच्या पुढील उज्ज्वल कारकिर्दीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.

श्री. नागेश दादा फाटे म्हणाले: कुणाल पवार यांची इचउ मध्ये एुशलींळींश ीळींरपीं पदी झालेली निवड ही त्यांच्या कष्टाचे, बुद्धिमत्तेचे आणि प्रामाणिकपणाचे फळ आहे. त्यांनी हे पद मिळवून आपल्या कुटुंबाचे नाव मोठे केले आहे. आम्हाला विश्वास आहे की ते अत्यंत उत्कृष्ट काम करतील.

हा सत्कार समारंभ श्री. पवार यांच्या भावी आयुष्यासाठी एक प्रेरणास्रोत ठरणार आहे. याप्रसंगी माजी तालुकाध्यक्ष अनिताताई पवार, विनय शिंदे, निवृत्ती भटकर, सुमित बागल, संग्राम कापसे, हर्षा सुतार मॅडम, नागेश काळे व इतर मान्यवर उपस्थित होते.

राज्याचा मंत्री धार्मिक, जातीय तेढ वाढवणारे वक्तव्य करत असेल तर ते हिताचं नाही; शरद पवारांची आशिष शेलारांवर टीका

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

मुंबई : राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी मंत्री आशिष शेलार यांच्यावर नाव न घेता निशाणा साधला आहे. राज्याचा एक ज्येष्ठ मंत्री जातीयवादावर निवेदन करत असेल तर ते हिताचं नाही, असं शरद पवार म्हणाले. आशिष शेलारांनी पत्रकार परिषद घेत महाविकास आणि मनसेवर दुबार मतदारांवरुन निशाणा साधला होता. त्यावेळी त्यांनी मुस्लिम दुबार मुद्दा उपस्थित केला होता. त्यानंतर शरद पवारांनी त्यांच्यावर टीका केली आहे.

शरद पवार म्हणाले की, या राज्यात सामाजिक ऐक्य कसे राहील याची काळजी सर्वांनी घेतली पाहिजे. विशेषतः सरकारमध्ये जे आहे त्यांची जबाबदारी जास्त आहे. जे राज्य सरकारमधील मंत्री आहेत, एक ज्येष्ठ मंत्री जर धार्मिक आणि जातीय तेढ वाढवण्यासंबंधी वक्तव्य करत असेल तर ते राज्याच्या हिताचं नाही. मतदारयादीतील घोळ आणि बोगस मतदानावरून गेल्या काही दिवसांपासून विरोधकांनी आरोपांचं रान उठवलं आहे. याच मुद्द्याला धरून सत्ताधारी भाजपही आता मैदानात उतरल्याचं दिसून आलं.

जिल्हा परिषद व नगरपालिका निवडणूक

प्रचार साहित्य

अत्याधुनिक निवडणूक मोबाईल ॲप फक्त आमच्या कडेच वापरा व हमखास निवडून या.

मतदार स्लिप नांव व मतदान केंद्रासहीत फक्त आमच्याकडेच मिळतील.

प्रचार साहित्य
१. डमी वोटिंग मशिन
२. झेंडे, टोपी,पंचा ३. बिल्ले
४. मतदार स्लिप ५.स्टिकर ६.पॉम्प्लेटस
७. स्लिप प्रिंटर ८. सॉफ्टवेअर
९. बॅचेस १०. एस.एम.एस./व्हाईस कॉल

नितीन कन्सलटन्सी
नितीन हलसगी
मो. 9595427070 / 9270325070

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय :** सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय :** प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

महाराष्ट्र राज्यातील २४६ नगर परिषदा आणि ४२ नगर पंचायतींच्या निवडणुका जाहीर

२ डिसेंबरला मतदान, ३ डिसेंबरला होणार मतमोजणी; नगरपरिषद, नगरपंचायतींच्या कार्यक्षेत्रात आचारसंहिता लागू

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

मुंबई : महाराष्ट्राच्या राजकारणातील सर्वात मोठी बातमी समोर आली आहे. राज्य निवडणूक आयोगाची आज अतिशय महत्त्वाची पत्रकार परिषद पार पडली. या पत्रकार परिषदेला राज्य निडणूक आयोगाचे आयुक्त दिनेश वाघमारे, सचिव सुरेश काकाने, उपसचिव सुर्यकृष्ण मूर्ती, उपायुक्त राजेंद्र पाटील उपस्थित होते. यावेळी आयुक्त दिनेश वाघमारे यांनी राज्यातील २४६ नगर परिषदा आणि ४२ नगर पंचायतींचा कार्यक्रम जाहीर केला. या सर्व नगर परिषदा आणि नगर पंचायतींसाठी येत्या २ डिसेंबरला मतदान होणार आहे. त्यानंतर लगेच दुसऱ्या दिवशी ३ डिसेंबरला मतमोजनी होणार आहे

नगर परिषद आणि नगर पंचायत यांचा प्रत्यक्ष कार्यक्रम जाहीर करत आहोत. नामनिर्देशन पत्र दाखल करण्याची सुरुवात ही १० नोव्हेंबर २०२५ पासून होईल. नामनिर्देशन पत्र दाखल करण्याची अंतिम मुदत ही १७ नोव्हेंबर २०२५ असेल. नामनिर्देशन पत्राची १८ नोव्हेंबर २०२५ ला छाननी होईल.

अपील नसलेल्या ठिकाणी नाम निर्देशन पत्र माघारी घेण्याची मुदत ही २१ नोव्हेंबर २०२५ असेल. अपील असलेल्या ठिकाणी नामनिर्देशन पत्र माघार घेण्याची अंतिम मुदत २५ नोव्हेंबर २०२५ असेल, अशी माहिती निवडणूक आयुक्तांनी दिली.

निवडणूक चिन्ह नेमून देण्याचा तसेच अंतिमरित्या निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी ही २६ नोव्हेंबर २०२५ ला जाहीर होईल. मतदानाचा दिवस हा २ डिसेंबर २०२५ असेल आणि मतमोजणीचा दिवस ३ डिसेंबर २०२५ असेल. शासन राजपत्रात निकाल प्रसिद्ध करण्याचा दिवस हा १० डिसेंबर २०२५ असेल, अशी महत्त्वाची माहिती निवडणूक

आयुक्तांनी दिली.

सर्वोच्च न्यायालयाने ३१ जानेवारी २०२६ पूर्वी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्याचे निर्देस दिले आहेत. त्या दृष्टीने आपल्याशी संवाद साधावा आणि आपल्या मार्फत हा संदेश पोहोचवण्यासाठी ही पत्रकार परिषद आयोजित केलेली आहे. ही पत्रकार परिषद फक्त नगर परिषद आणि नगर पंचायती संदर्भात आहे. राज्यातील पात्र असलेल्या २४६ नगर परिषदा आणि ४२ नगर पंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुका घेण्यात येणार आहेत. यामध्ये एकूण ८६८५९ सदस्य आणि २८८ अध्यक्षांची निवड होणार आहे. २४६ नगर परिषदांमध्ये १० नवनिर्वाचित नगरपरिषदांचा समावेश आहे. २३६ नगर परिषदांची मुदत यापूर्वीच संपलेली आहे.

राज्यात एकूण १४७ नगरपंचायती आहेत. त्यापैकी ४२ नगरपंचायतींसाठी निवडणूक होत आहे. त्यामध्ये १५ नवनिर्वाचित आहे. तर २७ नगरपंतायतींची मुदत यापूर्वी संपलेली आहे. उर्वरित १०५ नगरपंतायतींची मुदत समाप्त झालेली नाही.

नगर परिषदांची सदस्य संख्या ही २० ते ७५ आहे आणि नगर पंचायतची सदस्य संख्या ही १७ आहे. नगर परिषदेची निवडणूक ही बहुसदस्य पद्धतीने आहे. साधारण एका प्रभागामध्ये दोन जागा नगर परिषदेमध्ये असतात. पण नगर परिषदेचा सदस्य संख्या विषम असेल तर एका प्रभागात तीन जागा असतात. साधारणत: मतदारांना दोन ते तीन सदस्यांसाठी मतदान करावं लागेल. याशिवाय नगर परिषदेचा एक अध्यक्ष राहील त्याच्यासाठी देखील मतदान करावं लागेल. नगर पंचायतीमध्ये एक सदस्य आणि एक अध्यक्ष असतो. त्यामुळे तिथे मतदारांना २ मते द्यावी लागतील.

नामनिर्देशन हे निवडणूक आयोगाने निर्माण केलेल्या संकेतस्थळावर स्वीकारले जातील. एका प्रभागाम्ये एका उमेदवाराला जास्तीत जास्त चार नामनिर्देशन पत्र दाखल करता येतील. यासोबत जात वैधता प्रमाणपत्र आवश्यकता आहे. ज्यांनी जात वैधता प्रमाणपत्रासाठी अर्ज केला आहे त्यांना अर्ज केल्याची पावती जमा करावी लागील. पण असा उमेदवार निवडून आला तर त्याला निवडून आल्यानंतर सहा महिन्यात जात वैधता प्रमाणपत्र देणं आवश्यक राहील.

नगर परिषद आणि नगर पंचायतींसाठी मतदार यादी प्रसिद्ध झाली आहे. मतदान केंद्र निहाय मतदान याद्या ७ नोव्हेंबरला जाहीर होणार आहे.

उमेदवारांसाठी खर्च मर्यादा वाढवण्यात आली आहे. अ वर्ग नगर परिषदेसाठी सदस्य पदासाठी ५ लाख आणि अध्यक्ष पदासाठी १५ लाख, ब वर्गासाठी अध्यक्ष पदासाठी ११ लाख २५ हजार आणि सदस्य पदासाठी ३ लाख ५० हजार, क वर्गासाठी अध्यक्ष पदासाठी ७ लाख ५० हजार आणि सदस्य पदासाठी २ लाख ५० हजार. नगरपंचायतीसाठी अध्यक्ष पदासाठी ६ लाख आणि सदस्य पदासाठी २ लाख २५ हजार अशी खर्चाची मर्यादा आहे.

मतदारांसाठी जे संकेतस्थळ विकसित केली आहे त्यामध्ये सर्च फॅसिलिटी दिली आहे. त्यामध्ये मतादारांना त्यांचं नाव आणि मतदान केंद्र शोधता येईल. मतदारांसाठी मोबाईल ॲप तयार केलं आहे. त्यामध्ये तुमच्या उमेदवारांविषयी आणि इतर सर्व माहिती मिळेल.

छत्तीसगडमध्ये पॅसेंजर- मालगाडीची समोरासमोर धडक, सहा प्रवाशी ठार, रेल्वेचे अनेक डबे रुळावरून खाली

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

नवी दिल्ली : छत्तीसगडमधील बिलासपूर येथे लालखदान रेल्वे स्थानकाजवळ मोठा रेल्वे अपघात घडला आहे. हावड़ा रूटवर चालणारी पॅसेंजर ट्रेन आणि मालगाडीची समोरासमोर धडक झाली. त्यामध्ये आतापर्यंत सहा जणांचा मृत्यू झाल्याची माहिती आहे, तर अनेकजण जखमी आहेत. जखमींवर जवळच्या रुग्णालयात उपचार सुरू असून मृतांच्या आकडेवारीत वाढ होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. रेल्वे प्रशासनाने त्वरित रेस्क्यू टीम आणि मेडिकल युनिट घटनास्थळी पाठवले आहे. स्थानिक प्रशासनही मदतीसाठी पोहोचले आहे. या अपघातामुळे संपूर्ण रूटवरील अनेक ट्रेन रद्द करण्यात आल्या असून काहींना पर्यायी

मार्गान वळवण्यात आलं आहे. कोरबा पॅसेंजर ट्रेन आणि मालगाडीमध्ये जोरदार धडक झाली. या अपघातात आतापर्यंत ६ प्रवाशांच्या मृत्यू झाल्याची प्राथमिक माहिती आहे. तसेच १२ पेक्षा जास्त प्रवासी जखमी झाले आहेत. या ठिकाणी बचाव कार्य सुरू असून लोकांचीही मोठी गर्दी जमली आहे. जखमी प्रवाशांना जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांच्यावर उपचार सुरु आहेत. अपघात इतका जबरदस्त होता की पॅसेंजर ट्रेन मालगाडीवर चढली होती. घटनास्थळी प्रवाशांच्या किंचाळ्या आणि आरडाओरडामुळे भीतीचे वातावरण निर्माण झाले. रेल्वे प्रशासन आणि स्थानिक प्रशासन यांनी बचाव कार्य त्वरित सुरु केले. अपघातामुळे अनेक ट्रेन पर्यायी मार्गावर पाठवण्यात आल्या आहेत. अपघाताचे कारण अद्याप अज्ञात असून, रेल्वे तपासणी सुरु आहे. राज्याचे माजी मुख्यमंत्री आणि काँग्रेस नेते भूपेश बघेल यांनी या अपघाताबद्दल दु:ख व्यक्त केले आहे. तसेच या अपघातासाठी कारणीभूत असलेल्यांवर कारवाई करण्याचा इशाराही दिला.

ऑल इंडिया पॅन्थर सेनेचे धाराशिव जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी यांना निवेदन

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

धाराशिव :प्रतिनिधि/ सुधाकर रणदिवे : ऑल इंडिया पॅन्थर सेने तर्फे धाराशिव जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी धाराशिव यांना निवेदन देण्यात आले. गेल्या महिन्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे मोहा ता कळंब येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाज मंदिराची मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले आहे, त्यामुळे ऑल इंडिया पँथर सेनेची मागणी आहे,की त्या ठिकाणी मोठे संविधान सभागृह बांधण्यात यावे, येत्या महिन्याभरात संविधान सभागृहाचे बांधकाम चालू करण्यात यावे, अन्यथा ऑल इंडिया पँथर सेनेकडून पूर्ण तालुक्यांतील समाज बांधवातर्फे तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशाराही देण्यात आला आहे.

यावेळी ऑल इंडिया पॅन्थर सेनेचे धाराशिव ग्रामीण जिल्हा अध्यक्ष अशोक कसबे, माजी जिल्हा परिषद सदस्य संदीप मडके,सामाजिक कार्यकर्ते बाबासाहेब कसबे, ग्रामपंचायत सदस्य राहुल कसबे, कोंडीबा कसबे, उद्धव कसबे हे उपस्थित होते.

ग्रामीण रुग्णालय अक्कलकोट येथे बहरतोय वनऔषधी बाग; ६० विविध औषधी वनस्पती आणि अन्य वृक्षाने बाग फुलले

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

अक्कलकोट/प्रतिनिधी : ग्रामीण रुग्णालय अक्कलकोट येथे ६० विविध औषधी वनस्पती युक्त बाग बहरले असून त्यात आणखी वेगवेगळ नवीन वृक्ष फुलले असून त्याने ग्रामीण रुग्णालय परिसराचे सौंदर्य वाढले असून यामुळे तेथील वातावरण आणखी आल्हाद दायक बनले आहे.यासाठी ग्रामीण रुग्णालयाचे अधीक्षक व डॉक्टर यांनी सततचे प्रयत्न सुरु ठेवले असून त्यामुळे ग्रामीण रुग्णालय अक्कलकोट येथील धन्वंतरी औषधी वनस्पती उद्यान निर्मितीचे उद्देश सफल बनल्याचे दिसून येत आहे.मागील चार वर्षांपासून डॉ. सतीश बिराजदार व अन्य सर्वांचे सुरु असलेले प्रयत्न फळास आल्याचे सदर बाग पहिल्यानंतर दिसत आहे.डॉ. अशोक राठोड यांची संकल्पना आणि मार्गदर्शन तसेच लोकसहभाग यातून अतिशय सुंदर असे आयुर्वेद वन औषधी बाग निर्माण झाले आहे.याचा मुख्य उद्देश लोकांना आयुर्वेदाचे महत्व कळावे त्यातील सर्व वनस्पती यांची नावे, गुणधर्म व उपयोग सर्वांना माहिती व्हावे यासाठी राष्ट्रीय आयुष अभियान उपक्रमातून सदर सुंदर आयुर्वेद वनऔषधं बाग निर्माण होऊन त्याची काळजीपूर्वक देखभाल केली जात आहे. यामुळे शासनाचे मूळ उद्देश साध्य होऊन इतर प्राथमिक आरोग्य केंद्र यांना प्रेरणा घ्यावी असाच हा उपक्रम आहे.या ६ गुंठा क्षेत्रातील बागेत

कृष्ण तुळस, राम तुळस, सब्जा तुळस, लवंग तुळस,कापूर तुळस, मिंट, तुळस, शतावरी, गवती चहा, करवंद, काळी हळद,रिटा, आवळा, आपटा, शमी, कागदी लिंबू,सीडलेस लेमन, लवंग, विलायची, वड,पिंपळ, लिंब, अन्नपूर्णेश्वरी,काळीमिरी, करंजा, अडुळसा, गोकर्णवेल, भद्राक्ष,रुद्राक्ष यासारखे एकूण ६० वनऔषधी वृक्ष व इतर शोभेची व उपयुक्त झाडें लावली आहेत. या धन्वंतरी औषधी वनस्पती उद्यान निर्मितीस

सहाय्यक संचालक आयुष्य,राष्ट्रीय आयुष्य अभियान डॉ. विलास सरवदे, माजी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.सुहास माने, ग्रामीण रुग्णालय वैद्यकीय अधीक्षक डॉ.अशोक राठोड, ग्रामीण रुग्णालयातील डॉ.रवी बनसोडे, डॉ. सतीश बिराजदार, डॉ.निखिल क्षीरसागर,डॉ. बाबासाहेब सुलतानपुरे, डॉ.नीरज जाधव,डॉ. सुशांत आल्हाट यांच्यासह गुरबसप्पा अल्लापुरे,शिवानंद चितली, राजू जडगे यांच्यासह ग्रामीण रुग्णालयातील सर्व कर्मचारी वर्ग यांच्या अनमोल सहकार्याने सदर औषधी वनस्पती उद्यान फुललेले आहे.याच्या जोपसनेसाठी

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष मा. जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले, अक्कलकोट नगरपरिषद, निसर्ग सेवा मंडळ अक्कलकोट,अध्यापक विद्यालय अक्कलकोट अक्कलकोट शहरातील सर्व शाळांमधील एनसीसी छात्र आणि शिक्षक वर्ग, स्वयंसेवी संस्था, व्यक्तिगत मदत, रुग्ण कल्याण समिती या सर्वांच्या अमूल्य सहकार्यातून सदर धन्वंतरी औषधी वनस्पती उद्यान निर्मिती झाली आहे. दिवसेंदिवस आणखी वेगवेगळे विविध प्रकारचे वृक्ष या ठिकाणी लावून उद्यानाचा आणखी विस्तार करण्याचा ग्रामीण रुग्णालय अक्कलकोट यांचा मानस आहे.

माऊली हळणवार यांची मागणी

तहसीलदारांना दिले विविध मागण्यांचे निवेदन

पंढरपूर तहसील कार्यालयातील झिरो कर्मचारी तात्काळ काढून टाका

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पंढरपूर/प्रतिनिधी : आज पंढरपूर तहसीलदार सचिन लंगोटे यांना भाजपा किसान मोर्चा व रेशन दुकानदार व सर्वसामान्य नागरिक यांच्या वतीने निवेदन देण्यात आले पंढरपूर तहसील आवारातील पुरवठा शाखेमध्ये झिरो कर्मचाऱ्यांचा वावर असून सर्व शासकीय कागदपत्रे शासकीय ऑनलाईन लॉगिन वापरून मनमानी कारभार करून भ्रष्टाचार करत असून यांना तात्काळ आवारात येण्यास मज्जाव करावा असे निवेदन दिले गेल्या अनेक दिवसापासून या कर्मचाऱ्यांनी पंढरपूर पुरवठा विभागात प्रचंड भ्रष्टाचार केला असून रेशन कार्ड मध्ये नावे वाढवणे नवीन रेशन कार्ड देणे ऑनलाईन रेशन कार्ड करणे धान्य ऑनलाईन करणे यामध्ये पैसे घेऊन कामे केले जात असुन तक्रार करून सुद्धा कार्यवाही केली जात नाही.

तसेच पंढरपूर तहसील कार्यालयातील पुरवठा विभागात बेकायदेशीर काम करणाऱ्या ३ झिरो कर्मचारी यांना काम करण्यास प्रतिबंध करण्यात यावा. शासकीय गोपनीय कागदपत्रे तसेच, माहितीची देवाण घेवाण करणे, दुकानदार यांना तपासणी धमकी देणे, रेशन कार्ड कामे न करणे, आर्थिक गैरव्यवहार करणे अशी कित्येक कामे बेकायदेशीर होत आहेत.

त्यामुळे भाजपा किसान मोर्चाच्या वतीने माऊली भाऊ हळणवर यांच्या नेतृत्वाखाली.

निवेदन देण्यात आले यावेळी शंकर सुरवसे, दिलीप पावले, अमर भांडेकर, समाधान रोगे, शरद पवार, दता चव्हाण अपर्णा तारके,राणी कदम, शुभांगी हाके, विकास गायकवाड, अंकुश ढोणे, सोम नाथ कुलकर्णी, सागर कारंडे, विजय मोरे गणेश पंडित यांचे सह पदाधिकारी उपस्थित होते.

प्रदेशाध्यक्ष व अनेक मंत्र्यांच्या उपस्थितीत प्रकाश पाटील परिवार भाजपमध्ये प्रवेश करणार

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क



पंढरपूर/प्रतिनिधी : माळशिरस तालुक्यातील प्रभावशाली मानले जाणारे पाणी येथील पाटील कुटुंबीय भाजपच्या संपर्कात असलेली चर्चा होत होती. त्यांच्या पक्षप्रवेशाचा भव्य कार्यक्रम होणार असल्याची माहिती सूत्राकडून मिळाली होती. आणि आता अखेर पाटील कुटुंबीय भाजपमध्ये पक्षप्रवेश व श्रीराम शिक्षण संस्था संचालित श्रीराम महिला विज्ञान महाविद्यालय पाणी या महाविद्यालयाच्या नूतन इमारतीचे उद्घाटन समारंभ शुक्रवार दिनांक ७ नोव्हेंबर २०२५ रोजी दुपारी बारा वाजता श्रीराम शिक्षण संस्था क्रीडा पाणी विटी अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न होणार आहे.

यावेळी प्रमुख उपस्थितीत जलसंपदा मंत्री गोदावरी व कृष्णा खोरे राधाकृष्ण विखे पाटील सार्वजनिक बांधकाम विभाग मंत्री श्रीमंत छत्रपती शिवेंद्रसिंह राजे भोसले , ग्रामविकास व पंचायत राज्यमंत्री तथा सोलापूर जिल्ह्याची पालकमंत्री नामदार जयकुमार गोरे अक्कलकोटचे आमदार सचिन कल्याण सिटी पंढरपूर मंगळवेढा मतदारसंघाचे आमदार समाधान आवताडे भाजपचे आमदार गोपीचंद पडळकर उपस्थित राहणार आहेत.

आ. सचिनदादा कल्याणशेट्टी
यांच्या वाढदिवसानिमित्त
हार्दिक शुभेच्छा
भाजपा तालुका उपाध्यक्ष
मा. प्रदिप जगताप
सरपंच
वनिता सुरवसे
उपसरपंच
कमलाकर सोनकांबळे
युवा नेतृत्व
निजप्पा गायकवाड
युवा नेता
धोंडूराज बनसोडे
आरपीआय युवा नेता
प्रा. राहुल रूही
सिद्धार्थ सोशल फौंडेशन | ग्रामपंचायत गोगांव

युवा नेतृत्व,
पाणीदार आमदार,
मा. सचिन दादा कल्याणशेट्टी
यांच्या
वाढदिवसानिमित्त
हार्दिक शुभेच्छा
शुभेच्छुक :
हॉटेल सिद्धगंगा
बसवराज शेळके
प्रकाश पोमाजी
प्रोप्रा. प्रकाश सिद्धाराम पोमाजी (मालक) वागदरी अक्कलकोट रोड, वागदरी ता. अक्कलकोट

मा. सचिन दादा कल्याणशेट्टी यांना
वाढदिवसानिमित्त
खूप खूप शुभेच्छा!....
हार्दिक शुभेच्छा
तालुकाध्यक्ष
उपसरपंच
मा. निजप्पा गायकवाड
मा. कमलाकर सोनकांबळे
शुभेच्छुक
निजप्पा गायकवाड मित्र परिवार, अक्कलकोट

युवा नेतृत्व,
पाणीदार आमदार,
विकासाचे दूरदृष्टिकोन
असलेले सर्वसामान्याचे
न्याय हक्कासाठी लढणार
मा. सचिन दादा कल्याणशेट्टी
यांच्या
वाढदिवसानिमित्त
हार्दिक शुभेच्छा
बसवराज शेळके
सुनील सावंत
प्रदीप पाटील
प्रदीप जगताप
शुभेच्छुक
सुनिल सावंत मित्र परिवार वागदरी ता. अक्कलकोट

युवा नेतृत्व,
पाणीदार आमदार,
विकासाचे दूरदृष्टिकोन
असलेले सर्वसामान्याचे न्याय
हक्कासाठी लढणारे
मा. आ. सचिन (दादा) कल्याणशेट्टी यांच्या
वाढदिवसा निमित्त
हार्दिक शुभेच्छा
शुभेच्छुक
सरपंच
उपसरपंच
तालुकाध्यक्ष
मा. वनिता सुरवसे
मा. कमलाकर सोनकांबळे
मा. निजप्पा गायकवाड
मा. आ. सचिन (दादा) कल्याणशेट्टी
सिद्धार्थ सोशल फौंडेशन, महाराष्ट्र राज्य

हार्दिक शुभेच्छा
तालुकाध्यक्ष, आरपीआय
मा. अविनाश मडिखांबे
अक्कलकोट तालुक्याचे
लोकप्रिय तथा पाणीदार
आमदार
सचिन (दादा) कल्याणशेट्टी
आपणास वाढदिवसाच्या
कोटी कोटी शुभेच्छा!
ता. सरचिटणीस (आरपीआय ए)
मा. राजू भगळे
शुभेच्छुक
राजू भगळे (ता. सरचिटणीस, आरपीआय (ए) अक्कलकोट